(Pages 1 to 3)

1.

कविकुलगुरु–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः, महाराष्ट्रम्

**रामटेक कार्यालय** : – प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक, जिल्हा–नागपूर – 441 106

**नागपूर कार्यालय** :– महाराष्ट्र गांधी स्मारक निधी संस्था, कस्तुरबा भवन, ज्ञानेश्वर मंदिराजवळ, बजाज नगर, नागपूर

Ramtek Ph No. (07114) 256476, Telefax 255549 Nagpur Ph.No. (0712) 2248094

जा. क्र. ककासंवि/नाम/2010/308 दिनांक :– 08.06.2010

प्रति,

मा. अध्यक्ष/ सचिव,

क.का.संस्कृत विश्वविद्यालयाशी संलग्नित महाविद्यालये.

(सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे)

**विषयः– सर्व महाविद्यालयातील प्राचार्य/अधिव्याख्याता पदे दि. 31 मे, 2010 पूर्वी नियमित स्वरूपात न भरल्याबाबत...**

**संदर्भः–** 1) मा. उच्च न्यायालय याचिका क्र. 2216/2006 अन्वये दि. 31.12.2008 चे आदेश

2) प्रस्तुत विश्वविद्यालयाचे पत्र क्र. ककासंवि/विद्या/2009/41, दि. 06.01.2009

3) प्रस्तुत विश्वविद्यालयाचे पत्र क्र. ककासंवि/विद्या/2009/211, दि. 20.02.2009

4) शासन परिपत्रक क्र. एनजीसी 2008/(379/08)/मशि–3, दि. 7 मार्च, 2009

5) प्रस्तुत विश्वविद्यालयाचे पत्र क्र. ककासंवि/विद्या/2009/476, दि. 09.04.2009

6) प्रस्तुत विश्वविद्यालयाचे पत्र क्र. ककासंवि/विद्या/2009/666, दि. 16.05.2009

7) मा. सर्वोच्च न्यायालय एसएलपी क्र. 13944/2009 अन्वये दि. 29.05.2009 चे आदेश

8) प्रस्तुत विश्वविद्यालयाचे पत्र क्र. ककासंवि/विद्या/2009/1438, दि. 30.10.2009

**9) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. 2009/(435/09)/विशि–3, दि. 30.01.2010**

10) प्रस्तुत विश्वविद्यालयाचे पत्र क्र. ककासंवि/विद्या/2009/237, दि. 22.02.2010

11) प्रस्तुत विश्वविद्यालयाचे पत्र क्र. ककासंवि/विद्या/2009/354, दि. 22.03.2010

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्रतील अकृषी महाविद्यालयांमध्ये अर्हताधारक कायमस्वरूपी प्राचार्याची नियुक्ती करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने 2008 साली दिले होते. त्यानुसार दि. 31 मे, 2009 पर्यंत प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याची जबाबदारी त्या त्या शैक्षणिक महाविद्यालयावर होती. याबाबत विश्वविद्यालयानेही आपणाशी वारंवार पत्रव्यवहार करून या बाबीचे गांभीर्य आपल्या निदर्शनास आणून दिले होते. परंतु दि. 31 मे, 2009 पर्यंत आपल्या महाविद्यालयात प्राचार्याची नियुक्ती करण्यात आली नव्हती. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाच्या तत्कालीन निर्णयानुसार सर्व प्राचार्यविहीन महाविद्यालयांना एक वर्षाची मुदत प्राचार्य/अधिव्याख्याता भरतीसाठी देण्यात आली होती. ती मुदत दि. 31 मे, 2010 पर्यंतची मुदत नुकतीच संपली असून या कालावधीतही दिलेल्या अनेक स्मरणपत्रांनुसार अर्हताधारक प्राचार्यांची नियुक्ती न झालेल्या महाविद्यालयांवर मा. उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय लागू करणे क्रमप्राप्त आहे. यानुसार प्रथम वर्षाच्या वर्गाचे सत्र 2010–11 चे प्रवेश न करण्याचा आदेश देण्यात आलेला आहे. न्यायालयाच्या या आदेशाचे काटेकोरपणे पालन करणे विद्यापीठाची व महाविद्यालयांची जबाबदारी आहे. या सूचनेनंतरही सत्र 2010–11 साठी अर्हताधारक प्राचार्य नसलेल्या महाविद्यालयांमध्ये छात्र प्रवेशीत झाल्यास हे सर्व प्रवेश नियमबाह्य असतील.

महत्वाचे :–

**महाराष्ट्र शासन निर्णय क्र. 2009/(435/09)/विशि–3, दि. 30.01.2010** अन्वये असे नमूद केले आहे की, ज्या महाविद्यालय/संस्थांनी दि. 31 मे, 2010 पर्यंत प्राचार्यांची पदे भरली नाही त्यांनी प्रथम वर्षाचे प्रवेश करू नयेत. या शासन आदेशान्वये ज्या महाविद्यालयांनी प्राचार्यांची पदे भरण्याबाबतची आणि मान्यतेबाबतची कार्यवाही पूर्ण केलेली नाही तसेच नियमानुसार अर्हताधारक प्राचार्यांची नियुक्ती केलेली नाही अशा महाविद्यालयांची यादी या पत्रासोबत जोडण्यात आलेली आहे. ही यादी विश्वविद्यालयाच्या www.sanskrituni.net या संगणकीय संकेतस्थळावर सर्व संबंधितांच्या माहितीस्तव प्रकाशित करण्यात आलेली आहे. उच्च न्यायालय व महाराष्ट्र शासन यांच्या आदेशास अनुसरून विश्वविद्यालयाने प्रवेशासाठी सदर प्रतिबंध केलेला आहे. सर्व महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष 2010–11 साठी प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला प्रतिबंध करण्यात आलेला आहे. यात एक वर्ष मुदतीच्या अभ्यासक्रमांचाही समावेश आहे याची कृपया नोंद घ्यावी. सबब यादीतील या महाविद्यालयात प्रथम वर्षासाठी शैक्षणिक वर्ष 2010–11 मध्ये प्रवेश प्रक्रिया करू नये असे आदेश याद्वारे पारित करण्यात आले आहेत. अशा महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रिया केल्यास ती नियमबाह्य असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी आणि मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावनी न केल्यामुळे अवमानाची जबाबदारी देखील ही त्या त्या संबंधित महाविद्यालयांचीच असेल याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

भवदीया,

नंदापुरे

संचालक

विद्यापीठ नियोजन विकास मंडळ

## कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

प्रथम वर्षाचे (सत्र 2010–11) प्रवेश निषिद्ध केलेली कायम विना अनुदानित संलग्नित पदवी महाविद्यालये

| अ.क्र | महाविद्यालयाचे नांव |
|---|---|
| 1. | समर्थ इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन, सावकार नगर, अचलपूर शहर, जि.अमरावती या संस्थेचे<br>**कीर्तनकेसरी भाऊसाहेब शेवाळकर अध्यापक महाविद्यालय, परतवाडा, जि. अमरावती** |
| 2. | दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, ई–275, 44, कमलपुष्प, कॉंग्रेस नगर, अमरावती या संस्थेचे<br>**रामकृष्ण शिक्षाशास्त्री (बी.एड्.) महाविद्यालय, दारापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती** |
| 3. | भोंडेकर सांस्कृतिक क्रीडा व सामाजिक शिक्षण विकास संस्था, भंडारा या संस्थेचे<br>**एम.बी.कॉलेज, बँक कॉलनी, सहकार नगर, पांढराबोडी, भंडारा** |
| 4. | दि.हर्बल इंडिया डेव्हलपमेंट सोसायटी, सावित्रीबाई फुले नगर, नागपूर या संस्थेचे<br>**चक्रपाणी पंचकर्म योग व निसर्गोपचार महाविद्यालय, ओंकार नगर, नागपूर** |
| 5. | चॅरिटेबल डिस्पेंसरी, नागपूर या संस्थेचे<br>**भारतीय शास्त्र महाविद्यालय, मार्ग क्र. 4, विश्वकर्मा नगर, नागपूर –27** |

**(This list is subject to correction, if any.)**

स्वा/–

**संचालक**

**विद्यापीठ नियोजन विकास मंडळ**

**प्रत माहितीसाठी :–**

1) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, चौथा माळा, मंत्रालय, मुंबई – 32
2) संचालक, उच्च शिक्षण, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे –1
3) सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, जुने मॉरिस कॉलेज परिसर, नागपूर
4) उपकुलसचिव (परीक्षा), क.का.संस्कृत विश्वविद्यालय, बजाज नगर, नागपूर
5) सचिव, केंद्रीय बी.एड्. प्रवेश प्रक्रिया–2010–11, क.का.संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक